Newspaper : Maharashtra Times

Article dated : 1/2/2018

Description : Story about successful NSS-Camp of Podar college NSS unit

आदेश पुरंदरे, पोदार कॉलेज
muntainbox@gmail.com

# पोदारकरांनी जपलं सामाजिक भान



**एनएसएस युनिटचं बऱ्हाणपूर गावात कौतुकास्पद कार्य**

देशाच्या प्रगतीचा आढावा घ्यायचा असेल तर त्या देशातील गावांच्या वस्तुस्थितीकडे पहावं असं म्हणतात. त्यासाठी भारतातील खेडी सुस्थितीत आहेत ना आणि प्रगतीच्या दिशेने त्यांची वाटचाल सुरू आहे ना याकडे सरकारबरोबर प्रत्येक भारतीयाने स्वतःची जबाबदारी म्हणून पाहणं गरजेचं आहे. याच गोष्टीचं भान ठेवून पोदार कॉलेजच्या एनएसएस युनिटने बोईसर जवळील बऱ्हाणपूर गावात गावकऱ्यांना स्वच्छतेचे धडे दिले. एवढंच नाही तर एका त्रासदायी कच्चा रस्त्याचं पक्क्या रस्त्यात रूपांतर करण्यासाठी श्रम दानही केलं.

शिक्षणाबरोबर आरोग्यासंबंधित समस्याही उद्भवतात. त्यासाठी यावर्षी गावातील पाच शाळांमध्ये मोफत 'ओरल हेल्थ कॅम्प'चं आयोजन करण्यात आलं होतं. विद्यार्थ्यांनी गावातील बऱ्याच ठिकाणी जाऊन काही जीवघेण्या आजाराविषयी पथनाट्याद्वारे माहिती दिली. तसंच कॉलेजमध्ये झालेल्या 'क्लोथ डोनेशन वीक'च्या माध्यमातून जमा केलेले कपड्यांचं वाटप या गावामध्ये करण्याचं आलं. 'विद्यार्थ्यांनी आपुलकीने या गावातील गावकऱ्यांना मदत केली. यांच्याकडे पाहून देशाचं भविष्य जबाबदार आणि सक्षम हातात आहे याची खात्री पटली', असं मत पोदार कॉलेजच्या एनएसएस युनिटच्या मुख्य विनिता पिंपळे यांनी मांडलं.